# दि. १४/१०/२०१९

## चिंचवड येथील कंपनींची मॅन इन द मिडल अटॅक पद्दतीव्द्ारे फसवणुक करुन विदेशातील बँकेत गेलेली लाखो रक्कम (५०,७६,३३७/- रु.) सायबर क्राईम सेल पिंपरी चिंचवड यांनी परत मिळवून दिली.

दिनांक २४/०८/२०१९ रोजी **मित्तल प्रिसिजन प्रेशर डाय कास्टींग एलएलपी** या कंपनीने Yizumi Precision Machinery HK CO LTD या चिनी कंपनीकडून एक प्रोडक्ट खरेदी केले होते. सदर प्रोडक्टचे पेमेंट करण्यासाठी अर्जदार यांचे कंपीनीने नमुद चिनी कंपनीला मेलद्वारे बँक डिटेल्स मागविल्या होत्या. त्याप्रमाणे दि.२१/०८/२०१९ रोजी सदर चिनी कंपनीने अर्जदार यांना Hang Seng Bank Yaumati BR चा खाते क्रमांक पेमेंट करण्यासाठी दिला. परंतू दि.२४/०८/२०१९ रोजी finance.ind@yziumi.com या फेक मेल आयडीवरून अर्जदार यांना सदरची चिनी कंपनी त्यांची बँक बदलत असल्याचा मेल आला व त्यामध्ये यु.के. या देशातील Barclays Bank चा खाते क्रमांक देऊन त्यावर पेमेंट करण्यास सांगितले असता अर्जदार यांनी ६२०१०/- युएस डॉलर (भारतीय चलनात ४४,७९,९१७/- रुपये) सदर अकाऊंटला पाठविले. पेमेंट केल्यानंतर अर्जदार यांनी संबंधित चिनी कंपनीचे भारतातील एजंट यांना फोनद्वारे पेमेंट केले असल्याबाबतची माहिती दिली असता सदर चिनी कंपनीच्या भारतातील एजंटने त्यांचे बँकेच्या खात्यावर पैसे आले नसल्याचे सांगितले. तेव्हा अर्जदार यांनी त्यांना आलेला मेल चेक केला असता सदर मेलमधील दोन अक्षरांची अदलाबदल केली असल्याचे दिसुन आल्याने अर्जदार यांना त्यांची फसवणुक झाली असल्याचे लक्षात आले. सदरबाबत अर्जदार यांनी सायबर सेल येथे तक्रारी अर्ज दिला असता सायबर सेलचे अधिकारी व कर्मचारी यांनी अर्जदार यांचे कंपनीचे व विदेशी कंपनीच्या मेल आयडींचे सायबर ॲनालीसीस केली असता अर्जदार यांचे कंपनीचा मेल आयडी हॅक न होता विदेशातील कंपनीचा मेल आयडी हॅक झाल्याचे सायबर सेलच्या लक्षात आले. त्यामुळे तात्काळ यु.के. या देशातील Barclays Bank या बँकेसोबत ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करुन सदरच्या पैशांचा व्यवहार थांबविण्याबाबत कळविले. तसेच सदरचे पेमेंट हे Chas Bank, J.P.Morgen, New York या पेमेंट गेटवे द्वारे झाल्याने सदर बँकेलाही मेल करुन झालेले फ्रॉड ट्रान्जेक्शन थांबविण्यास सांगितले व त्यानंतरही वारंवार यु.के. देशातील Barclays Bank या बँकेकडे पाठपुरावा करुन अर्जदार यांची फसवणुक झालेली ६२०१०/- यु.एस. डॉलर (भारतीय चलनात ४४,७९,९१७/- रु.) रक्कम सायबर सेल, पिंपरी चिंचवड यांनी अर्जदार यांचे बँक अकाऊंटवर परत केली.

त्याचप्रमाणे **लुमिनियस सेल्स इंटरनॅशनल** कंपनीला त्यांचे विदेशातील रॉ मटेरीयल पुरवविणाऱ्या कंपनीचा मेल आला की, आमचे कंपनीशी संबंधीत दोन्ही मेल आयडी बंद झाले असुन आपल्या कंपनीला काही रॉ मटेरियल लागत असल्यास आमच्या नविन मेल आयडीवर मेल करा असे मेल व्द्ारे कळवीले होते. नंतर लुमिनियस सेल्स इंटरनॅशनल या कंपनीने संबंधीत विदेशातील कंपनीला रॉ मटेरियलची मागणी करताच सदर विदेशी कंपनीने अर्जदार यांना चेस बँक, न्युयॉर्क या बँकेत USD 8420 (5,97.376/- रु) भरण्यास सांगीतल्याने अर्जदार यांनी सदर अकाऊंटला पैसे भरले होते. पैसे भरल्यानंतर अर्जदार यांनी काही दिवसांनी संबधीत विदेशी कंपनीला मटेरियल बाबत फोन केला असता समोरील कंपनीने आम्हाला आपले कोणत्याही प्रकारचे पैसे मिळाले नसुन आमच्या कंपनीचा कोणताही मेल आय.डी बंद झाला नाही व आम्ही कोणत्याही चेस बँकेच्या अकाऊंटला आपल्याला पैसे भरण्यास सांगीतले नाही असे कळाल्याने अर्जदार यांनी त्यांची आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्षात आले तेव्हा त्यांनी तात्काळ सायबर सेल येथे तक्रार दिली असता साबयर सेल येथील अधिकारी व कर्मचारी यांनी अर्जदार यांची फसवणुक होवुन विदेशात गेलेली रक्कम परत मिळविण्यासाठी संबंधीत बँकेला तात्काळ पत्रव्यवहार व फोन करुन सदरच्या पैश्याचा व्यवहार थांबविण्यास कळविले. सदर चेस बँक, न्युयॉर्क यांनी अर्जदार यांची फसवणुक झालेली 5,97,373/- रु रक्कम अर्जदार यांचे कंपनीच्या बँक अकाउन्टवर परत केली आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त मा.श्री.संदीप बिष्णोई साो, सह पोलीस आयुक्त मा.श्री.प्रकाश मुत्याळ साो, अपर पोलीस आयुक्त मा.श्री.रामनाथ पोकळे साो, पोलीस उप आयुक्त मा.श्री.सुधीर हिरेमठ साो, सहा पोलीस आयुक्त मा.श्री.श्रीधर जाधव साो यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधाकर काटे, सहा पो.नि. गरुड, पो.उपनि निलेश बोडखे, स्वाती लामखडे कर्मचारी मनोज राठोड, भास्कर भारती, अतुल लोखंडे, नितेश बिचेवार, विशाल गायकवाड, पोपट हुलगे, प्रदिप गायकवाड, युवराज माने, कृष्णा गवळी, नाजुका हुलवळे, स्वप्नाली जेधे यांचे पथकाने केली आहे.

**सायबर सेलचे नागरीकांना आवाहन –**

१) नेहमी आपल्या ई-मेल आयडीची सिक्युरिटी अपडेट ठेवा तसेच ई-मेल खात्याचे पुनरावलोकन करा.

२) कंपनीच्या अकाऊंट डिपार्टमेंटमध्ये काम करणा-या लोकांना या सायबर गुन्हयांविषयी जागरुक करा कारण त्यांचेमध्ये अशा फसवणुकी विषयी जागरुकता नसल्याने तेच या प्रकारच्या गुन्हयांना बळी पडतात.

३) ज्या वेळेस एखादी कंपनी नेहमीच्या बँक अकाउन्ट ऐवजी दुसऱ्या बँक अकाउन्टवर पैसे पाठविण्यास सांगत असल्यास टेलीफोनिक पडताळणी वरुन व्यवहार विनंतीची खात्री करा.

४) व्यवहार करतांना येणारे मेलचे डोमेन काळजीपुर्वक तपासा.

५) सायबर क्राईम फसवणुकी संबंधी तात्काळ सायबर सेल पिंपरी चिंचवड येथे संपर्क करावा.